ePaper


# राहुल गांधीच पंतप्रधान पदाचे उमेदवार": कलमनाथ



|वर्ष - 6 | अंक - 257 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


गुड बाय 2022

www.mahaenews.com | शनिवार | दि. 31 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# प्राधिकरण बाधितांना साडेबारा टक्के परतावा प्रश्न अखेर सुटला

## तब्बल 40 वर्षांनंतर पिंपरी-चिंचवडच्या भूमिपूत्रांना न्याय

## 12.5%

## आमदार महेश लांडगे यांच्या लक्षवेधीला राज्य सरकारचे उत्तर



**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील बाधित भूमिपुत्रांना अखेर ४० वर्षांनंतर न्याय मिळाला. राज्य सरकारने आगामी १५ दिवसांत साडेबारा टक्के परतावा देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल. शहरातील १०६ बाधित शेतकऱ्यांना सव्वा सहा टक्के जमीन आणि २ चा 'एफएसआय' परतावा देण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी प्राधिकरण बांधितांचा साडेबारा टक्के परतावाबाबत लक्षवेधी सूचना केली. याला उत्तर देताना राज्य सरकारने पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्रांना दिलासा देण्याची भूमिका घेतली आहे.**

आमदार लांडगे सभागृहात बोलताना म्हणाले की, प्राधिकरण बाधितांच्या न्याय हक्कांसाठी २०१४ ते २०१९ दरम्यान परतावाबाबत आम्ही वेळोवेळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला आहे. २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दि. १ जुलै २०१९ रोजी झालेल्या बैठकीत पिंपरी-चिंचवडमध्ये आवश्यक जागा शिल्लक नसल्यामुळे ५० टक्के जागा आणि ५० टक्के 'एफएसआय' देण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार संपादित क्षेत्राच्या ६.२ टक्के एवढी जमीन तिच्या मालकास प्राधिकरणाच्या अटींच्या अधिन राहून वाटप करण्यात यावी. तसेच, अशा जमिनीचा परतावा करताना २ चटई क्षेत्र एवढा निर्देशांक मंजूर करण्यात यावा. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक ती सुधारणा करावी, अशी मागणी आम्ही वेळोवेळी अधिवेशनात केली. मात्र, गेल्या अडीच वर्षांच्या काळात राज्य सरकारकडून याबाबत कोणताही निर्णय झाला नाही.

त्यामुळे फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी सभागृहात केली.

लक्षवेधीला उत्तर देताना राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, राज्यात भाजपाची सत्ता असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांना दिलासा देण्याचे निर्देश दिले होते. मात्र, महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या सत्ताकाळात आणि महापालिकेतील प्रशासक राजवटीमध्ये याबाबत कार्यवाही प्रशासनाकडून याबाबत अंमलबजावणी केलेली नाही. याची कारणे आमदार लांडगे यांना माहिती आहेत. प्राधिकरण बाधित १०६ बाधित शेतकऱ्यांना सव्वा सहा टक्के जमीन आणि २ चा 'एफएसआय' असा साडेबाराटक्के परतावा देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची घोषणा राज्य सरकार करीत आहे. याबाबत पुढील १५ दिवसांत यावर कार्यवाही करण्यात येईल, अशीही ग्वाही उद्योगमंत्री सामंत यांनी दिली.

### काँग्रेस-राष्ट्रवादीच्या काळात भूमिपूत्रांकडे दुर्लक्ष...


**सन १९७२ ते १९८३ या कालावधीत संपादित केलेल्या जमिनींकरीता एकूण १०६ लाभार्थींना २६.०३ आर इतके देय क्षेत्र आहे. प्राधिकारणाने सन १९७२ ते ८३ च्या शेतकऱ्यांसाठी २ चटई क्षेत्र निर्देशांक त्यामधील १५ टक्के वाणिज्य वारासह अनुज्ञेय करण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मंजुरीच्या प्रतिक्षेत होता. प्राधिकरणाच्या स्थापनेपासून १९७२ ते १९८३ पर्यंत हा प्रश्न तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकाने प्रलंबित ठेवला. त्यानंतर पिंपरी-चिंचवडसह राज्यातील सत्तेत असलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसने शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही. विशेष म्हणजे, २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय घेतलेला असतानाही त्याची महाविकास आघाडी सरकारच्या काळात अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्रांमध्ये नाराजीचा सूर होता. दरम्यान, आमदार लांडगे यांनी हा प्रश्न अधिवेशनात उपस्थित केला. त्याला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कार्यवाही करण्याची घोषणा झाली. त्यामुळे प्राधिकरण बाधितांचा प्रश्न ४० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर निकालात निघाला आहे.**

# प्रशासनाकडून GOOD NEWS : पुणेकरांनो, रात्रभर करा नववर्षाचं स्वागत!

## काही नियमांमध्ये शिथिलता, काही महत्त्वाचे नियम जारी

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

नववर्षाच्या स्वागतासाठी पुणेकर सज्ज झाले आहेत. या नववर्षाच्या स्वागतामध्ये कोणतेही गालबोट लागू नये यासाठी पुणे पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे काही महत्त्वाच्या नियम जारी केले आहेत. तसेच काही नियमांमध्ये शिथिलता आणली आहे.



राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे अधिक्षक चरणसिंह राजपूत यांनी दिलेल्या माहितीनुसार, 31 डिसेंबरला पुण्यातील रेस्ट्रोबार पहाटे पाच वाजेपर्यंत सुरु राहणार आहे. त्यामुळे यंदा पुणेकरांचं नवं वर्ष धुमधडाक्यात साजरा होणार आहे. राज्य शासनाच्या आदेशानुसार पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात रेस्ट्रोबार पहाटे पाच वाजेपर्यंत तर वाईन, बिअर आणि देशी मद्य विक्री दुकाने रात्री साडेदहा ऐवजी रात्री एक वाजेपर्यंत सुरु राहणार आहेत.

नववर्षाचं स्वागत करण्यासाठी राज्यातील सर्वजण सज्ज झाले आहेत. त्यात कोरोनामुळे दोन वर्ष 31 डिसेंबरला निर्बंध घालण्यांत आले होते. यावर्षी निर्बंधमुक्त नव्या वर्षाचं स्वागत करता येणार आहे. त्यामुळे अनेकांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साहाचं वातावरण दिसत आहे. दरवर्षी मोठ्या उत्साहात नव्या वर्षाचं स्वागत केलं जातं. यंदाही त्याच उत्साहात नव्या वर्षाच्या स्वागतासाठी अनेक नागरिक आतूर आहेत. या दिवशी पुण्यात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे.

### प्रशासनाची जय्यत तयारी

नववर्षाच्या स्वागतासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जोरदार तयारी केली जात असून यावर नजर ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून 14 पथक नेमण्यात आले असून त्या व्यतिरिक्त 10 विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.या महिन्याभरात तब्बल 200 गुन्हे दाखल करण्यात आले असून यात 8 वाहने देखील जप्त करण्यात आले आहे.राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडे नववर्षाच्या स्वागतासाठी वन डे पार्टी लायसन्स जवळपास 24 अर्ज आलेले आहे.जवळपास 100 वन डे पार्टी लायसन्स येण्याची शक्यता अ आहे.तसेच जवळपास 1 लाख 65 हजार मद्य परवाने वाटप करण्यात आले आहे.ज्यांच्याकडे कायम स्वरुपी मद्य बाळगण्याच परवाना नसेल त्यांना वन डे परवाना देण्यात येतो. त्याची फी ही 5 रू असून ज्यांच्याकडे परवाना नसेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

---

# कोरोनाची नवी लाटः देशांमध्ये संसर्गाचा फैलाव झपाट्याने!

## संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे भाविकांना गर्दी न करण्याचे आवाहन

**। आळंदी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चीन, अमेरिका, जपानसह अनेक देशांमध्ये कोरोनाची नवी लाट आलेली आहे. या देशांमध्ये संसर्गाचा फैलाव झपाट्याने होत असल्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने योग्य खबरदारी घेण्याच्या सूचना केलेल्या आहेत. परिणामी या सर्व बाबींचा विचार करता या संसर्गाचा फैलाव रोखणे हे शासनाबरोबर आपल्या सर्व सुजाण नागरिक भाविकांचे कर्तव्य आहे.**



तीर्थक्षेत्र आळंदी येथे येणारे भाविक, वारकरी ग्रामस्थ व अन्य दर्शनार्थी तसेच व्यापक समाजहित विचारात घेऊन संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीच्या वतीने सर्व भाविक, भक्तांना आवाहन करण्यात आले आहे की, संत श्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर व परिसरामध्ये गर्दी करू नये.

वयोवृद्ध, लहान मुले, तसेच आजारी व्यक्ती, यांनी शक्यतो गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये. तसेच मंदिर परिसरात सर्वांनी मास्कचा वापर करुन मंदिर परिसरात प्रवेश करावा, असे आवाहन ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी कमिटीचे प्रमुख विश्वस्त योगेश वसंतरीक देसाई यांनी केले आहे.

# भारतातील पहिल्या संविधान भवनच्या कामाला गती द्या : आमदार महेश लांडगे

**। पिंपरी । प्रतिनिधी।**

देशातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये प्रस्तावित आहे. मात्र, गेल्या अडीच वर्षांच्या काळात या कामाकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात संविधान भवनाच्या कामाला गती द्यावी, अशी आग्रही मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, भारतीय संविधानाविषयी प्रत्येक नागरिक साक्षर करणे गरजेचे आहे. त्यासाठी देशातील पहिले 'संविधान भवन' पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या पेठ क्रमांक पाच व आठमधील मोकळ्या भूखंडावर हे 'संविधान भवन' उभारण्यात यावे. याबाबत आम्ही पाठपुरावा करीत आहोत. संविधान



भवनाची उभारणी झाल्यास संविधानाविषयी जागरुकता निर्माण होण्यास मदत होईल. या संविधान भवनाच्या माध्यमातून संविधानाची जनजागृती करण्यात येईल. संविधान भवनमध्ये अभ्यास केंद्र, त्यामध्ये तज्ज्ञांचे संविधानावर अभ्यास वर्ग, कार्यशाळा, इतर राष्ट्रांच्या घटना तुलनात्मक अभ्यासासाठी माहितीची उपलब्धता, 'ई'-लायब्ररी, संविधानविषयी विविध पैलू चित्रकला दालन, यूपीएससी, एमपीएससी अभ्यासिका व अभ्यासवर्ग सुरु करण्याबाबत प्रस्ताव आहे.

दरम्यान, तत्कालीन महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात संविधान भवनच्या कामाबाबत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

### अवघ्या तीन दिवसांत 1500 हून अधिक ऑनलाईन अर्ज

# ‘इंद्रायणी थडी’ च्या नोंदणीला तुफान प्रतिसाद!




## शिवांजली सखी मंचतर्फे महिलांसाठी हक्काचे व्यासपीठ

**पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज ।**

**संपूर्ण महाराष्ट्रात अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या इंद्रायणी थडी जत्रेला यावर्षी तुफान प्रतिसाद मिळत आहे. संयोजकांनी सुरू केलेल्या ऑनलाईन नोंदणीला अवघ्या तीन दिवसांत १५०० हून अधिक इच्छुकांनी ‘स्टॉल बुकिंग’ केले आहे. त्यामुळे यावर्षीसुद्धा जत्रा नवा विक्रम प्रस्थापित करणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**

भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंचच्या पुढाकाराने प्रतिवर्षी महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता या हेतूने भोसरीमध्ये इंद्रायणी थडी जत्रेचे आयोजन केले जाते. पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून या ठिकाणी महिला बचत गट आपली उत्पादने विक्रीसाठी स्टॉल लावतात. यावर्षी एकूण ८०० स्टॉलचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला बचत गटांची विविध खाद्य उत्पादने, सौंदर्यप्रसाधने, जीवनावश्यक वस्तू असे विविध स्टॉल नागरिकांसाठी पर्वणी राहणार आहेत. जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जत्रेचे नियोजन असून, मनोरंजन, ऑटोमोबाईल, पर्यावरणपुरक उत्पादने, रोजगार मेळावा, विविध स्पर्धा, ग्राम संस्कृती, लहान मुलांसाठी खेळणी अशा सुमारे १५० निरनिराळे उपक्रम नागरिकांना मोफत पहायला, ऐकायला आणि अनुभवायला मिळतील. यासाठीही ऑनलाईन नोंदणी करता येते. त्यासाठी HTTPS://QRCO.DE/BDAR38 या लिंकवर अर्ज करता येईल. तसेच, अधिक माहितीसाठी संजय पटनी 9851318513 आणि राहुल पाखरे 8856808833 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन समन्वयक संजय पटनी यांनी केले आहे.

### ऑनलाईन बुकिंग अर्जांची होणार छाननी...

**इंद्रायणी थडी जत्रेकरिता ऑनलाईन स्टॉल बुकिंग सुविधा आहे. त्यामुळे इच्छुकांनी यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी. संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे १० हजार अर्ज नोंदणी होण्याची शक्यता आहे. त्यामाध्यमातून केवळ ८०० स्टॉल निश्चित करण्यात येतील. त्यासंदर्भात अर्जांची छाननी करण्यात येईल. प्रामुख्याने खाद्य पदार्थांसाठी शाकाहारी आणि मांसाहारी असे दोन प्रकार आहेत. उत्पादनांसाठी विविध स्टॉल प्रकारण उपलब्ध करुन दिले आहेत. सर्व नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन असून, ‘लकी ड्रॉ’ द्वारे स्टॉल वाटप केले जाणार आहे. ऑनलाईन बुकिंग सुविधा दि.५ जानेवारी २०२३ पर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असेही आवाहन संजय पटनी यांनी केले आहे.**

# महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी ‘286 कोटीं’चा खर्च

## आयुक्तांची मान्यता, तीन वर्षांत इमारतीचे होणार काम

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपरी-चिंचवड महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत उभारण्यासाठी 286 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. हैद्राबाद येथील केएमव्ही प्रोजेक्ट लिमिटेड या ठेकेदाराकडून हे काम करुन घेण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंगळवार (दि. 27) झालेल्या स्थायी समितीच्या सभेत मान्यता दिली. कामाचा कालावधी तीन वर्षांचा असणार आहे. आजच्या मान्यतेमुळे पुढील तीन वर्षांत महापालिकेची नवीन इमारत उभी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी चिंचवड, ऑटो क्लस्टर समोरील आरक्षण क्रमांक 181 ड (पै) या सात एकराच्या भूखंडावर 13 मजली प्रशासकीय इमारत उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने 312 कोटी 20 लाख 32 हजार 838 रुपये खर्चाची निविदा 23 मे 2022 रोजी प्रसिद्ध केली होती. सुरुवातीली निविदेला प्रतिसाद न मिळाल्याने पालिका प्रशासनाने तीनवेळा मुदतवाढ दिली होती. दिलेल्या मुदतीत 5 ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. त्यातील 3 ठेकेदार अपात्र झाले. तर, केएमव्ही प्रोजेक्ट हैदराबाद आणि बी.जी शिर्के या 2 ठेकेदारांची निविदा पात्र ठरली.

केएमव्ही प्रोजेक्ट लिमिटेड हैद्राबाद या ठेकेदाराने रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून 8.19 टक्के कमी म्हणजे 286 कोटी रुपयांची निविदा सादर केली होती. संबंधित ठेकेदार मुदतीमध्ये काम करण्यास सक्षम असल्याने आयुक्त सिंह यांनी ही निविदा स्वीकारण्यास मान्यता दिली आहे. केएमव्ही प्रोजेक्ट लिमिटेड या ठेकेदाराकडून रॉयल्टी, मटेरियल टेस्टींग चार्जेसह दोनशे कोटी 86 लाख रुपयांत काम करुन घेण्यास आणि त्यांच्यासोबत करारनामा करण्यास आयुक्त सिंह यांनी स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

### 300 नगरसेवकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था

**महापालिकेची चिंचवड स्टेशन या ठिकाणी 35 एकर जागा आहे. त्यापैकी 7 एकर जागेत 13 मजली प्रशस्त पर्यावरणपूरक इमारत उभारण्याचे नियोजन आहे. भविष्यातील 50 वर्षांचे नियोजन करून या इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला. महापालिकेच्या विविध विभागासह पदाधिकाऱ्यांची दालने असतील. प्रशस्त सभागृह, मीटिंग हॉल, कॅण्टीन, स्वच्छतागृह आणि इतर सोयी असणार आहे. उर्वरित जागेत सिटी सेंटर उभारण्यात येणार आहे. पाच मजली स्वतंत्र इमारतीमध्ये वाहनतळ असणार आहे. त्यात 500 मोटारी आणि दीड हजार दुचाकी पार्क करता येणार आहेत. तर, महापालिका सभागृहात 300 नगरसेवकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था असणार आहे. इमारतीच्या गच्चीवर हेलिपॅड असणार आहे.**

### आताच्या इमारतीत जागा पडतेय अपुरी

सध्याची पालिकेची इमारत अपुरी पडत आहे. अनेक विभागांची कार्यालये इतर इमारतींमध्ये स्थलांतरित केली आहेत. वास्तुविशारद लॅण्डमार्क डिझाइन ग्रुप यांनी 17 डिसेंबर 2019 रोजी इमारतीचा विविध पर्यायांतील आराखडा सादर केला होता. 24 हजार 544 चौरस मीटर क्षेत्राच्या भूखंडावर त्यांनी नऊ मजली इमारतीचा आराखडा तयार केला होता.

## संपादकीय »

# नकारात्मकतेचा कडेलोट

***विविध माध्यमांतून देशाबाबत आणि त्याच्या प्रागतिक वाटचालींबाबत अकारण नकारात्मकता निर्माण करण्याचा, पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याच्या प्रभावातून बाहेर पडून, सकारात्मकतेच्या मानसिकतेतून सुरू असलेल्या विकासकामांच्या लाभांकडे पाहायला शिकले पाहिजे, तरच वास्तवाचे भान येऊ शकेल.***

सरत्या वर्षाच्या कडू-गोड आठवणी सोबत घेऊन जात असताना आपण नव्या वर्षाची सुरुवात आशावादी भावनेने करत असतो. वाईट मागे सोडून देऊन, जे चांगले आहे ते बरोबर घेऊन वाटचाल करणे हा मनुष्याचा स्वभाव असतो. एकूणच, आपण सगळे दैनंदिन जीवनात सकारात्मक मानसिकतेने पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतो. पण काही व्यक्तींना अशी 'सकारात्मक मानसिकता' मान्य नसते. आजूबाजूला अनेक चांगल्या गोष्टी घडल्या तरी त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून वाईट काय घडत आहे तेवढे शोधत राहून ते चघळत बसण्याचा या लोकांचा स्वभाव असतो. ज्याच्या नावाने बोटं मोडता येतील, अशा ताज्या वाईट गोष्टी दिसल्या नाहीत तर जुन्या गोष्टी हुडकून त्यावर बोलण्यात असे लोक गर्क असतात. त्यात त्यांना एक प्रकारचे विकृत समाधान मिळत असते.

अशा अनेक व्यक्ती एकत्र येऊन जेव्हा त्यांचा समूह बनतो तेव्हा त्यांच्या या स्वभावाला हेतूंची जोड मिळते. त्यातून खास प्रकारची 'अपप्रचार यंत्रणा' उभी राहते. काही प्रसार माध्यमे आणि वृत्तपत्रे ही या 'यंत्रणेची' हत्यारे आहेत. या यंत्रणेने भारतातील वृत्तपत्रे व प्रसार माध्यमांना अशा नकारात्मकतेच्या शिखरावर नेऊन ठेवले आहे. नकारात्मक व विद्वेषी कथन विमर्ष तयार करून प्रस्थापित करण्याचा अखंड प्रयत्न करत राहणाऱ्या या वर्गाने ताळतंत्र सोडलेला आहे. गेल्या काही दिवसांत आवर्जून प्रसिद्ध केल्या गेलेल्या बातम्या आणि त्याचबरोबर पूर्ण 'व्यवस्था करून मारलेल्या बातम्या' बघताना हेच म्हणावे लागते.उदाहरणच द्यायचे तर काही दिवसांपूर्वी एक बातमी ठळकपणे 'चालवली' गेली. ती होती तथाकथित 'नाणेबंदी'बाबत! 'नोटांनंतर आता नाण्यांच्या वापरावर बंदी येणार' इथपासून ते 'नाण्यांचा वापर थांबल्यामुळे मंदिर व्यवस्थापन अडचणीत, त्यांच्यासमोर गंभीर पेचप्रसंग' अशा बातम्या अचानक झळकायला लागल्या. मंदिरांच्या देणग्यांबद्दल एरवी जहरी भाषेत बोलणारा हा वर्ग एकाएकी मंदिर व्यवस्थापनाच्या अडचणींची चर्चा करायला लागला. दैनंदिन जीवनात नाण्यांचा वापर घटला आहे, हे खरेच. नाण्यांचाच नाही तर नोटांचाही वापर घटला आहे. मात्र दैनंदिन व्यवहार सुरळीत सुरूच आहेत. नकारात्मक चित्र उभे करण्याच्या अट्टाहासातून हा प्रयत्न झाला.

# जुन्या खराब नोटा, बदलण्याची मोठी समस्या



भूमिका

निलेश दुटाळ
91- 87668 40811

जुन्या जीर्ण झालेल्या किंवा खराब झालेल्या नोटा या भारतातील जनता, पतसंस्था, सहकारी बँका तसेच राष्ट्रीय बँकांचा चिंतेचा विषय बनला आहे. जुन्या नोटा सारख्या वापरात येवून जीर्ण झालेल्या असल्या कारणाने त्यांची हाताळणी करताना फाटल्या जातात. अशा नोटा ज्या व्यक्तीच्या हातात आल्या त्या व्यक्तीला, खरेदी अथवा कोणतेही व्यवहार करताना अडचणी येतात.खिशात पैसे असताना देखील त्या पैशांची किंमत मात्र शून्य असते.

रिझर्व बँक (नोट रिफंड) नियम 2009, नुसार देशभरातील सर्व बँक शाखांनी ग्राहकांना सेवा पुरवणे आवश्यक आहे.बँक ग्राहकांना कोणतीही अडचण येऊ नये. तसेच जनतेला नोटा बदली करण्यासाठी रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयात जावे लागणार नाही. चांगल्या स्थितीतील सर्व नोटा, घाण झालेल्या (मळलेल्या) नोटा किंवा फाटलेल्या चिटकवलेल्या नोटा बदलण्यासाठी रिझर्व बँकेने जनतेच्या हितासाठी ही सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार बँकांच्या नियुक्त शाखांना (2009) नुसार, ज्या नोटेचे दोन पेक्षा जास्त तुकडे नाहीत, नोटेचे कोणतेही आवश्यक वैशिष्ट गहाळ नाही, नोटेचे सर्व अंक एकाच तुकड्याच्या अखंड भागावर उपस्थित आहेत अश्या नोटा घाण नोट्या समजून अशा नोटेचे पूर्ण मूल्य त्या व्यक्तीला दिले जावे व अश्या नोटा पुन्हा जारी केल्या जाऊ नयेत अश्या नोटा रिझर्व बँकेच्या कार्यालयात पाठवल्या जाव्यात असे आदेश रिझर्व बँकेने जारी केले असले तरी त्याची काटेकोरपणे बजावणी बँकाकडून केली जात नाही.त्याचा परिणाम मात्र सर्वसामान्य जनतेला भोगावा लागतो.

रिझर्व बँकेने सर्व बँकांना आदेश जारी केले असले तरी सर्वच्या सर्व बँका अश्या फाटक्या किंवा जीर्ण नोटा स्वीकारत नाहीत. काही बँका अश्या नोटा स्वीकारत असल्या तरी एका दिवसाला एका व्यक्तीकडून मोजक्याच नोटा स्वीकारल्या जातात. राहिलेल्या नोटा बदलण्यासाठी त्या व्यक्तीला दुसऱ्या दिवशी यावे लागते. अश्या सततच्या माराव्या लागणाऱ्या फेऱ्यासाठी जनतेला नाहक खर्च, वेळ, प्रवास करावा लागतो. असा नाहक खर्च टाळण्यासाठी



लोक बाहेरच्या दलालाकडून नोटा बदलून घेतात असे दलाल त्या व्यक्तीला नोटेची संपूर्ण किंमत देत नाहीत त्यामुळे त्या व्यक्तीला 10 ते 90 % तोटा सहन करावा लागतो.

अश्या जीर्ण झालेल्या नोटा फक्त एखाद्या व्यक्तीकडेच येत नाहीत तर लहान-मोठ्या पतसंस्थेचे खातेदार पतसंस्थेच्या खात्यामध्ये आपल्या जुन्या फाटक्या नोटा जमा करतात. त्यामुळे पतसंस्थेमध्ये देखील मोठ्या प्रमाणात जुन्या जीर्ण, फाटक्या चिकटवलेल्या, मळलेल्या नोटा जमा होतात. पतसंस्थेचे विशिष्ट बँकेमध्ये खाते असते त्या बँका अश्या नोटा स्वीकारण्यास नकार देतात. त्यामुळे पतसंस्थांना देखील बऱ्याच अडचणी येतात. मोठ्या प्रमाणात पैसा अडकून पडतो.प्रसंगी पथसंस्थेला आपल्या ग्राहकाला अथवा खातेदाराला अशा सुविधा पुरवता येत नाहीत त्यामुळे पथसंथेचे खातेदार नाराज होतात. रिझर्व बँकेच्या सर्व नियुक्त बँक शाखांनी त्यांच्या शाखेमध्ये एका सुस्पष्ट ठिकाणी 'डिफॉल्ट नोट्स येथे स्वीकारल्या जातील.' असा फलक लावून अश्या नोटा स्वीकारल्या पाहिजेत असे असताना देखील कोणत्याही बँकेमध्ये असे फलक लावल्याचे आढळून येत नाही. तसेच जुन्या खराब नोटा, खराब जोडलेल्या गंजलेल्या, जळलेल्या, एकत्र चिकटवलेल्या, दोन पेक्षा जास्त तुकडे जोडलेल्या अश्या नोटा .. पे.... किंवा पेड करुन रिझर्व बँकेच्या इश्यु ऑफिसमध्ये सादर करावयाच्या असतात. परंतु काही बँकांच्या चुकामुळे अश्या नोटा पुन्हा वापरात आणल्या जातात व त्याचा भुर्तंड सामान्य लोकांना भरावा लागतो.एकच खराब नोट बाजारात अनेक वेळा फिरते त्याचा भुर्दंड अनेक ग्राहकांना सोसावा लागतो.

भारतीय नोटा या दिर्घकाळ वापरात राहण्यासाठी नोटा हाताळताना व्यवस्थित हाताळल्या पाहिजेत परंतु काही व्यक्ती नोटांचा वैयक्तीक संदेश अथवा राजकीय घोषणा प्रसारित करण्यासाठी किंवा आपापल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी तर काही नोटांवर आकडेमोड, नोटांची सख्या लिहिणे अशा वैयक्तीक हेतूने वापर केला जातो. वैयक्तीक कारणांसाठी नोटांचा वापर केला जावू नये. नोटांचा सुरक्षित वापर केला तर नोटा दीर्घकाळ चलनात राहणार आहेत. त्यातून भविष्यात येणाऱ्या अडचणी टाळता येतील.तसेच अस्या खराब नोटा रद्द करून त्या बदल्यात नवीन नोटांची छपाई करण्यासाठी लागणाऱ्या खर्चात बचत करता येईल.

# क्रिप्टोकरन्सीची भीती नको!

**अमेरिकेतील 'एफटीएक्स' या क्रिप्टोकरन्सी अर्थात आभासी चलन विनिमय केंद्राचे दिवाळे वाजले. त्यामुळे क्रिप्टोकरन्सी व्यवहारांवर बंदी घालावी तसेच ही केंद्रे प्रतिबंधित करावीत यासारखी टोकाची भूमिका घेण्यात आली.**

तथापि, अशा आर्थिक घोटाळ्यामुळे संपूर्ण क्रिप्टोकरन्सी उद्योगावरच बंदी घालावी ही मागणी रास्त आहे का? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.

आजमितीस सर्वाधिक मागणी असलेल्या बिटकॉइन या आभासी चलनातील व्यवहार २००९ मध्ये सुरू झाले. आज जगभरात सुमारे नऊ हजारांपेक्षा अधिक क्रिप्टोकरन्सींमध्ये व्यवहार होत आहेत. कोणत्याही मध्यवर्ती यंत्रणेच्या हस्तक्षेपाशिवाय पैशाचे हस्तांतर वेगवान व किफायतशीरपणे व्हावे हा प्राथमिक उद्देश आभासी चलन सुरू करण्यामागे होता. बिटकॉइन या सर्वाधिक लोकप्रिय क्रिप्टोकरन्सीचे सुरुवातीचे मूल्य १ बीटीसी = ०.०००९ अमेरिकन डॉलर इतके होते. तथापि, या चलनाचा दिवसेंदिवस वाढणारा वापर व लोकप्रियतेमुळे याच्या मागणीत अविश्वसनीय वाढ झाल्याने बिटकॉइनचे डॉलरच्या तुलनेतील मूल्य अतिशय वेगाने वाढले, इतके की नोव्हेंबर २०२१ मध्ये एका बिटकॉईनचे मूल्य ६८,५०० डॉलर इतके उच्चांकी नोंदवले गेले. तथापि इथेरियम,



डॉजकॉईन यांसारख्या अन्य आभासी चलनांच्या मूल्यांमध्ये कमालीची असमानता असल्याने चलनमूल्यांमध्ये व पर्यायाने व्यवहारांमध्ये एकसमानतेचा अभाव आहे. याचे कारण हे व्यवहार मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाबाहेर असल्याने या व्यवहारांमध्ये कायदेशीरता, पारदर्शकता, विश्वासार्हता यांचा अभाव आहे.

नुकत्याच अमेरिकेत 'एफटीएक्स' या क्रिप्टोकरन्सी केंद्राने दिवाळखोरी जाहीर केली आणि जगभर त्याचे पडसाद उमटले. एका दिवसात १६ अब्ज डॉलरचे नुकसान झाल्याने क्रिप्टोकरन्सी उद्योगावर बंदी घालावी या मागणीने जोर धरला आहे. तथापि, या टोकाच्या निर्णयावर जाण्याआधी आभासी चलनाबरोबरच कायदेशीर चौकटीतील उद्योगांमधील आर्थिक घोटाळ्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे.

जगभरातील आर्थिक घोटाळे आणि कायदे

ब्लॉकचेन या तंत्रज्ञानाद्वारे चालणारे क्रिप्टोकरन्सीचे व्यवहार सुरक्षित मानले जातात. तथापि, 'स्टॅटिस्टा'च्या अहवालानुसार २०१८ व २०२० मध्ये जगभरातील विविध आभासी चलन केंद्रांमध्ये अनुक्रमे ९५० व ५१३ दशलक्ष डॉलरचा आर्थिक घोटाळा झाला. यामागे सायबरहल्ला हे एक कारण होते. पण केंद्रीय संस्थेच्या नियंत्रणाचा अभाव आणि आर्थिक व्यवहारांच्या यथायोग्य नोंदींचा व नियमिततेचा अभाव हे मूलभूत कारण आहे.

अर्थात, जगभरात अनेक देशांमध्ये याहीपेक्षा मोठे आर्थिक घोटाळे कायदेशीर नियंत्रण व नियमनाच्या कक्षेत असलेल्या अनेक उद्योगांमध्ये यापूर्वी झाले आहेत. यात बँकिंग उद्योग, शेअर बाजार, रोखे बाजार तसेच इतर उद्योगांचा समावेश आहे. अमेरिकेत २००१ मधील 'एन्रॉन'चा आर्थिक घोटाळा जगभरात सर्वज्ञात आहे. यामध्ये भागधारकांचे सुमारे ७४ अब्ज डॉलर बुडाल्याचे सांगितले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## नागपूर जिल्हा परिषदेचे 107 कोटी राज्य सरकारकडे अडकून!

# निधी देण्यास टाळाटाळ!

### काँग्रेसची सत्ता असल्याने मुख्यमंत्र्यांनी भेट टाळल्याचा आरोप

**। नागपूर । महाईन्यूज ।**

नागपूरात दोन वर्षांनंतर होत असलेल्या हिवाळी अधिवेशनासाठी आलेल्या मंत्र्यांच्या सेवेत नागपूर जिल्हा परिषदेची संपूर्ण यंत्रणा लागली आहे. परंतु, जिल्ह्यातील समस्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांच्या कानावर टाकण्यासाठी पहिल्या दिवसापासून भेटीकरिता वेळ मागितली असता अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मिळाली नाही.

काँग्रेसची सत्ता असल्याने वेळ देण्यासोबत निधी देण्याची टाळाटाळ होत असल्याचा आरोप अध्यक्षा मुक्ता कोकड्डे यांनी सांगितले.




### विविध विकास कामांवर शासनाकडून

**जिल्हा परिषदेचे 107 कोटी रुपये शासनाकडे प्रलंबित आहेत. जिल्हा परिषदेच्या 1 एप्रिल 2021 पासून ते आजपर्यंतच्या मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामांवर शासनाकडून स्थगिती दिली आहे. स्थगितीमुळे जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने विकास कामे ठप्प आहे.**

**त्यात प्राथमिक गरजा असलेली शाळा बांधकामे व दुरुस्ती, उपकेंद्र, बांधकामे व दुरुस्ती, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले पांधन रस्ते, रस्ते मजबुतीकरण दुरुस्ती, पुल बांधकाम, ग्रामपंचायत अंतर्गत येणारी जनसुविधा व नागरी सुविधांची कामे थांबलेली आहे. याबाबत ग्रामीण भागातील नागरिकांकडून सातत्याने पत्रव्यवहार करून विचारणा होते. परंतु, सदर विषय शासनाचा असल्याने जिल्हा परिषद हतबल आहे.**

### शासनाकडे 101 कोटी 17 लाख 48 हजार रुपयांचा निधी प्रलंबित

**याशिवाय जिल्हा परिषदेचा 2016-17 ते 2021-22 या कालावधीतील मुद्रांक शुल्क, अनुदानापोटी शासनाकडे 101 कोटी 17 लाख 48 हजार रुपयांचा निधी प्रलंबित आहे. याबाबत अतिरिक्त मुख्य सचिव ग्रामविकास विभागाकडे वारंवार मागणी करून निधी देण्याची विनंती केली. परंतु, अद्यापही निधी प्राप्त न झाल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच जिल्हा परिषदेचे महसूल विभागाकडून वाढीव उपकर अंतर्गत 2013-14 ते 2020-21 पर्यंतचा 6 कोटी 69 लाखांचा निधी थकित आहे. याची माहिती देण्यासाठी वेळ मागितला.**

## रतन टाटा यांच्या वाढदिवसानिमित्त शिवयोद्धा फाउंडेशन तर्फे अन्नदान

### द पुना स्कुल व होम फॉर द बिल्ड ट्रस्ट, कोरेगाव पार्क, पुणे येथे कार्यक्रम



**। पुणे। महाईन्यूज ।**

देशाच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लावणाऱ्या मंडळींमध्ये एका व्यक्तीचं नाव निर्विवादपणे घेतलं जातं. हे नाव म्हणजे टाटा उद्योग समुहाचे सर्वेसर्वा रतन टाटा. वयाचा आकडा वाढला असला तरीही या माणसाच्या मनाचं तारुण्य मात्र आजही 16 वर्षांच्या मुलाला लाजवेल असं आहे. सानथोरांमध्ये रमणाऱ्या, सर्वसामान्यांच्या व्यथा जाणणाऱ्या आणि त्यांच्यासाठी पुढाकारानं अनेक उपक्रम राबवणाऱ्या रतन टाटा यांचा 85 वा वाढदिवस. प्रत्येक क्षेत्रातून, प्रत्येकजण त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आहे.

उद्योजक रतन टाटा यांचा ८५ वा वाढदिवसानिमित्त शिवयोद्धा ग्रुप सोशल फाउंडेशन तर्फे सर रतन टाटा यांच्या वाढदिवसानिमित्त द पुना स्कुल व होम फॉर द बिल्ड ट्रस्ट, कोरेगाव पार्क, पुणे येथे अन्नदान आणि फळ वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. या वेळी शिवयोद्धा ग्रुप सोसिअल फाउंडेशनचे चेअरमन गणेश निवृत्ती सस्ते यांच्यासह अनेक सदस्यही उपस्थित होते. उद्योजक रतन टाटा यांनी भारताला उद्योग क्षेत्रात पुढं घेऊन जाण्यास बरीच मदत केली आहे. मागील वर्षीच्या आकडेवारीनुसार रतन टाटा यांच्याकडे एकूण संपत्तीची रक्कम सुमारे 3500 कोटी रुपये इतकी आहे. देशातील 433 वे श्रीमंत व्यक्ती म्हणून त्यांचं नाव घेतलं जातं. इतकी वर्षे उल्लेखनीय कामगिरी करूनही आणि उद्योग क्षेत्रात अनेक विभागांत सक्रिय असूनही टाटा यांची संपत्ती इतकी कमी कशी? हाच प्रश्न तुम्हाला पडतोय ना? तर, समाजाप्रती आपलीही काही जबाबदारी आहे हे जाणत टाटा यांनी अनेक समाजोपयोगी कामांमध्ये हातभार लावला, मोठ्या प्रमाणात दान केलं. अनेक धर्मादाय संस्थांना आर्थिक पाठबळ देत रतन टाटा यांनी एक वेगळ्या प्रकारची श्रीमंती जपली आणि हीच श्रीमंती त्यांना सर्वांच्या पुढे ठेवते.

# मागच्या काळात झालं ते गंगेला मिळालं, कशाला उकळत बसायचं

## अजित पवारांचा भरत गोगावलेंना टोला!



**। मुंबई । महाईन्यूज ।**

हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आज आरोप-प्रत्यारोपांचं जोरदार राजकारण रंगल्याचं पाहायला मिळालं. विशेषत: विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केलेल्या भाषणात विरोधकांसोबतच थेट ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनाच लक्ष्य केल्यामुळे विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला. विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांच्या भाषणावर उत्तर देताना “मागे काय घडलं ते सगळं सोडून द्या”, असा सल्ला दिला. यावेळी अजित पवारांच्या भाषणादरम्यान शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले मध्येच बोलल्यामुळे अजित पवारांनी त्यांना खोचक टोला लगावला. अजित पवारांनी मुख्यंत्र्यांच्या भाषणावर उत्तर देताना मागचं सगळं बाजूला सारण्याचा सल्ला दिला. “मागच्या काळात झालं ते गंगेला मिळालं. आता ते कशाला उकळत बसायचं. उकिरडा कितीही उकरला तरी त्यातून काही निघत नाही. नव्या वर्षात राज्याचे प्रमुख म्हणून तुम्ही निर्णय घ्या की ‘हे कुणी काही बोलत असतील तर माझे प्रवक्ते वगैरे त्यावर बोलतील’, असं अजित पवार यावेळी म्हणाले.

दीपक केसरकर आहेत ना एकदम वस्ताद बोलायला. ते एकदम कुठेही आठ्या पडू देत नाहीत. हसत नाहीत. रडत नाहीत. शांतपणे उत्तरं त असतो. प्रश्न विचारणाऱ्यालाच कळत नाही की याच्या मनात नक्की काय चाललंय. आणि जिथे कुठे खोच मारायचीये, तिथे बरोबर मारतो. अशी चांगली आम्ही तयार केलेली माणसं तुम्ही तयार घेतलेली आहेत. तुम्ही त्यांच्यावर जबाबदारी द्या”, असा सल्ला अजित पवारांनी एकनाथ शिंदेंना दिला. यावर बोलताना एकनाथ शिंदेंनी बसल्या बसल्याच “१०० दिवस ते बोलतात, एक दिवस तरी मी नको बोलू?” असा प्रश्न विचारताच अजित पवार म्हणाले,

### गोगावलेंचा ‘डिस्टर्बन्स’!

**दरम्यान, अजित पवार बोलत असताना समोरच्या बाकांवरून भरत गोगावले मध्येच काहीतरी बोलले. त्यावरून अजित पवारांनी त्यांना खोचक शब्दांत टोला लगावला. “गोगावले तुम्हाला कितीदा सांगितलं की तुम्ही मला बोलताना अडथळा आणू नका म्हणून. तुम्ही जेवढं मला डिस्टर्ब कराल, तेवढं तुमचं मंत्रीपद दूर जाईल. तुम्हाला माहीत नाही माझे आणि एकनाथ शिंदेंचे काय संबंध आहेत. काय तुम्हाला कळत नाही. कठीण आहे राव. तुम्ही आमदार आहात. जरा समजून घ्या”, असं अजित पवार यावेळी म्हणाले. परंतु, अद्याप मिळाला नाही. उद्या शेवटचा दिवस असून वेळ मिळण्याची आशा आहे, असे ते म्हणाले. यावेळी उपाध्यक्षा कुंदा राऊत, महिला व बाल कल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळे, सभापती मिलींद सुटे, सभापती राजु कुसुंबे, सभापती बालू जोध उपस्थित होते.**

# गुड बाय 2022:

# वर्षभरातील 10 महत्त्वाच्या घटना!

**| पुणे | महाईन्यूज | विशेष प्रतिनिधी |**

**सरत्या 2022 या वर्षाला निरोप देताना अनेक गोड गोड आठवणी घेऊन जात आहे. निरोपाच्या या पर्वामध्ये जेव्हा कोरोनाचा कहर झाला, तेव्हा भारतीयांच्या चेहऱ्यावर कोरोनामुळे स्पष्ट भीती व धास्ती स्पष्टपणे दिसत होती.आदिवासी महिला द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात पोहोचून भारतीय लोकशाहीत काहीतरी आहे हे सिद्ध केले, जिथे जात-धर्माचा विचार न करता कोणीही सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत पोहोचू शकतो. G-20 चे अध्यक्षपद मिळवण्याच्या यशामुळे भारताला जगात आपल्या वाढत्या सामर्थ्याची जाणीव झाली. अशा आणखी अनेक घटना आहेत, ज्यासाठी 2022 हे वर्ष कायम स्मरणात राहील.**

**त्यापैकी काही महत्त्वाच्या घटनांवर टीम महाईन्यूजने टाकलेला प्रकाशझोत...**




## 1. तवांगमध्ये तणाव

गलवाननंतर चीनने पुन्हा एकदा आपला चुकीचा डाव व्यक्त केला. 9 डिसेंबर 2022 रोजी, चिनी सैन्याने अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमधील यांगत्से येथे एलओसीवर अतिक्रमण करून परिस्थिती अस्वस्थ करण्याचा प्रयत्न केला. मात्र, यावेळी भारतीय जवान पूर्णपणे सज्ज होते आणि त्यांनी चीनला चोख प्रत्युत्तर दिले. या प्रकरणावरून संसदेत जोरदार गदारोळ झाला, राहुल गांधी यांच्या 'सैनिकांना मारहाण' या विधानासोबतच भाजपने काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. मात्र, या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे चीनला त्याचे परिणाम भोगावे लागले.

## 2. जागतिक स्तरावर भारताची ताकद दिसून आली

भारताला G-20 चे अध्यक्षपद मिळाले. '20' या शक्तिशाली गटाचे अध्यक्षपद मिळणे यावरून सिद्ध होते की संपूर्ण जगाला आता 'न्यू इंडिया'ची ताकद समजत आहे. जगातील विकसित देशांचा R20 गटात समावेश आहे, ज्यांचा जगातील ऊर्जेतील सहभाग सुमारे 85 टक्के आहे.

## 3. द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती बनल्या:

द्रौपदी मुर्मू यांच्या आधी प्रतिभा पाटील या एकमेव महिला होत्या ज्या राष्ट्रपतीसारख्या महत्त्वाच्या पदावर पोहोचल्या होत्या. तथापि, महामहिम मुर्मूचा या पदावर झालेला उदय अतिशय खास होता कारण ती आदिवासी समाजातून आली आहे. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत एकही आदिवासी व्यक्ती या सर्वोच्च पदावर पोहोचलेली नाही. अत्यंत नम्र कुटुंबातून आलेली, द्रौपदी मुर्मू यांनी 25 जुलै रोजी भारताच्या 15 व्या राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली.

## 4. काँग्रेसमध्ये परिवर्तनाचे वारे

दीर्घकाळ निष्क्रिय भासणाऱ्या काँग्रेसमध्ये यंदा नवचैतन्य, प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. मल्लिकार्जुन खर्गे २६ ऑक्टोबरला काँग्रेसचे अध्यक्ष झाले. सीताराम केसरींनंतर खरगे हे बिगर गांधी काँग्रेसचे अध्यक्ष बनणारे पहिले नेते आहेत. ही जबाबदारी प्रदीर्घ काळ श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडे होती. राहुल गांधी काही काळासाठी अध्यक्षही झाले.तर याच वर्षी राहुल गांधी यांनीही भारत जोडो यात्रा सुरू करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. राहुलने डिसेंबर अखेरपर्यंत 108 दिवसांत 9 राज्यांमध्ये सुमारे 2800 किलोमीटरचे अंतर कापले. नवीन वर्षात पंजाबमार्गे जम्मू-काश्मीरमध्ये हा प्रवास संपेल. यादरम्यान राहुल एकूण 3750 किलोमीटरचे अंतर कापणार आहेत. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेचा फायदा येत्या वर्षभरात होणाऱ्या कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि तेलंगणा विधानसभा निवडणुकीत मिळू शकतो.

## 5. पंजाबमध्ये आपचे सरकार आणि गुजरातमध्ये भाजपचा शानदार विजय

या वर्षी अनेक राजकीय घटना आणि निवडणुका पाहिल्या, परंतु सर्वात लक्षवेधी ठरले ते पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचा विजय आणि गुजरातमध्ये भाजपचा शानदार विजय. भाजपने गुजरातमध्ये आपली सत्ता तर वाचवलीच, पण 156 जागा जिंकून नवा विक्रमही रचला.मात्र, यावेळी भाजपला एका राज्याच्या पराभवालाही सामोरे जावे लागले. हिमाचलमध्ये त्यांची सत्ता गेली. 'आप'ने एमसीडीवरही कब्जा केला. काँग्रेसने पंजाब गमावला पण हिमाचलप्रदेश मिळवले. देशातील सर्वात मोठ्या राज्यांमध्ये यूपी आणि गोव्यात भाजपने यंदा सत्ता राखली आहे. यावेळी आम आदमी पक्षाला सर्वाधिक फायदा झाला. त्यांनी पंजाबमध्ये क्लीन स्वीप करून सरकार स्थापन केले, तर एमसीडीमध्येही 15 वर्षांनी भाजपला सत्तेतून बेदखल केले.

## 6. नुपूर शर्माच्या कमेंटवरून वाद

नुपूर शर्माने एका टीव्ही चर्चेदरम्यान पैगंबर मोहम्मद यांच्यावर केलेली टिप्पणी वर्षभर वादात राहिली. यासाठी नुपूर शर्माला जीवे मारण्याच्या धमक्याही आल्या होत्या. भाजपने त्यांना प्रवक्तेपदावरून दूर करण्याबरोबरच पक्षातून निलंबितही केले. एवढेच नाही तर नुपूरच्या वक्तव्याचे समर्थन करणाऱ्या उदयपूरच्या कन्हैया लाल टेलरची गळा चिरून हत्या करण्यात आली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील अमरावती येथे उमेश कोल्हे यांची हत्या करण्यात आली होती. असे असताना वर्षभर धर्मांधतेचा खेळ सुरूच होता.

## 7. हिजाब विवाद:

हिजाब विवाद हे प्रकरण ऑक्टोबर 2021 पासून सुरू झाले. 31 डिसेंबर 2021 रोजी उडुपी येथील सरकारी PU कॉलेजमध्ये हिजाब घालून आलेल्या 6 विद्यार्थिनींना वर्गात जाण्यापासून रोखण्यात आले. पण, २०२२ मध्येही हे प्रकरण बराच काळ तापत राहिले. नंतर, 5 फेब्रुवारी 2022 रोजी, कर्नाटक सरकारने महाविद्यालयांमध्ये हिजाब परिधान करण्यावर बंदी घालण्याचा आदेश जारी केला. कर्नाटकातील काही महाविद्यालयांमध्ये हिजाब परिधान करण्यावर बंदी आणल्यानंतर कर्नाटकच्या उच्च न्यायालयात दोन याचिकाही दाखल करण्यात आल्या होत्या. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, शैक्षणिक संस्थांमध्ये ड्रेस कोडचे पालन करणे आवश्यक आहे. हिजाब घालण्यास परवानगी दिली जाणार नाही. सर्वोच्च न्यायालयातही दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठांचे मत भिन्न होते. त्यामुळे हे प्रकरण सरन्यायाधीशांकडे पाठवण्यात आले.

## 8. संरक्षण क्षेत्रात अनेक उपलब्धी

या वर्षी भारताने संरक्षण क्षेत्रातही अनेक यश संपादन केले. भारतीय नौदलाला मिळाले पहिले स्वदेशी जहाज 'विक्रांत'. तर भारताने अग्नी-5 क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. 5000 पेक्षा जास्त फायर पॉवर असलेल्या या क्षेपणास्त्राच्या रेंजमध्ये चीनची सर्व प्रमुख शहरे आहेत. यासोबतच एनडीएमध्ये मुलींसाठी कायमस्वरूपी कमिशनही या वर्षीपासून सुरू झाले आहे. आगामी काळात मुलीही लष्करप्रमुख पदापर्यंत पोहोचू शकतील.

## 9. मोरबी पूल दुर्घटना:

गुजरात निवडणुकीपूर्वी 30 ऑक्टोबर रोजी मोरबी शहरात मच्छू नदीवर बांधलेला पूल कोसळल्यामुळे झालेल्या अपघातात 140 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. अपघात झाला तेव्हा पुलावर 500 हून अधिक लोक होते. या पुलाची क्षमता केवळ 125 लोकांची होती. या संपूर्ण प्रकरणात स्थानिक प्रशासनाचा निष्काळजीपणा समोर आला.

## 10. महाराष्ट्र आणि बिहारमध्ये सत्तापरिवर्तन:

या वर्षी अनेक राज्यांमध्ये निवडणुका झाल्या आणि निवडणुकांनंतर विजयी पक्षाला सत्ताही मिळाली, पण महाराष्ट्र आणि बिहारमध्ये निवडणुकांशिवाय सत्ता बदलली. महाराष्ट्रात मुख्यमंत्री बदलले, तर नितीशकुमार बिहारमध्ये मुख्यमंत्री राहिले, फक्त भाजपला सत्तेवरून हटवण्यात आले. महाराष्ट्रात, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या मोठ्या संख्येने आमदारांनी पक्षांतर करून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपसोबत युती करून सरकार स्थापन केले. सत्तेचा हा खेळ ज्या पद्धतीने चालला, उद्धव ठाकरे हात झटकत राहिले.



## कतरिनाचं नवऱ्यासोबत 'जंगल में मंगल'

**कतरिना कैफ आणि विकी कौशल हे बी-टाऊनमधील सर्वात लोकप्रिय जोडपं आहे. त्यांची केमेंस्ट्री ही चाहत्यांना खूप आवडते. यंदाचं वर्ष हे या कपलसाठी खूप महत्वाचं होतं. ते दोघेही अनेक रोमँटिक फोटो पोस्ट शेअर करत आपलं प्रेम व्यक्त करत असतात. चाहतेही नेहमीच त्यांच्या फोटोंची आतूरतेने वाट पाहत असतात. हे कपल आता नववर्ष साजरा करण्यासाठी बाहेर गेले आहे. दोघेहीसोबत निवांत वेळ घालवतांना दिसताय. ज्याची झलक कतरीनाने सोशल मीडियावर चाहत्यांसोबत शेअर केली आहे.**

**कतरिनाने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर फोटो शेअर केले आहेत. पोस्ट शेअर करताना तिने कॅप्शन दिले आहे, 'सो मॅजिकल.... मला वाटतं की हे माझ्या आवडत्या ठिकाणांपैकी एक आहे.**

**कतरिना कैफच्या फोटोंवर चाहत्यांच्या प्रतिक्रियाही दिल्या आहेत. हे सुंदर फोटो समोर येताच चाहतेही दोघांवर प्रेमाचा वर्षाव करत आहेत. एका चाहत्याने कमेंट केली- 'हॅप्पी हॉलिडे.' दुसऱ्याने म्हटले- 'जंगल में मंगल' अशा अनेक कमेंट्स त्याच्या पोस्टवर पाहायला मिळतील. कतरिना कैफ लवकरच तिच्या आगामी 'मेरी ख्रिसमस' या चित्रपटात विजय सेतुपतीसोबत दिसणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन श्रीराम राघवन करत आहेत. या चित्रपटाचे पहिले पोस्टर चाहत्यांसह शेअर केले आहे. यानंतर पुढील वर्षी प्रदर्शित होणाऱ्या टायगर 3 मध्येही ही कतरीना सलमान खानसोबत दिसणार आहे.**

# सेन्सॉर बोर्डाच्या माजी अध्यक्षाचा 'पठाण' चित्रपटाला पाठिंबा



अभिनेता शाहरुख खानची मुख्य भूमिका असलेला 'पठाण' हा चित्रपट गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत आहे. हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. या चित्रपटातील 'बेशरम रंग' गाण्यावरून नवा वाद रंगला आहे. या गाण्यात अभिनेत्री दीपिका पादुकोणने घाललेल्या भगव्या रंगाची बिकिनी परिधान केली आहे. भगव्या रंगाच्या बिकिनीवरून भाजपा आणि हिंदू संघटना आक्रमक झाल्या आहेत. त्यातच आता सेन्सॉर बोर्डाने या गाण्यात आणि चित्रपटात काही बदल सुचवले आहेत. हा संबंधित बदल करुन सेन्सॉर बोर्ड समोर हा चित्रपट सादर करावा, असे आदेश दिले आहेत. त्याप्रकरणी आता माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.'पठाण' चित्रपट नुकताच सेन्सॉर बोर्डाकडे पाठवण्यात आला. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनचे अध्यक्ष प्रसून जोशी यांनी गुरुवारी याबाबत निवेदन दिले. मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार चित्रपट परीक्षणाची प्रक्रिया कसून पार पाडली जात आहे. या समितीने 'पठान' चित्रपटात आणि गाण्यात काही बदल सुचवले आहेत. ते बदल करून चित्रपट प्रदर्शनाआधी नव्याने परीक्षण समितीकडे पाठवण्यात यावा, असे आदेश देण्यात आले आहेत. चित्रपटकर्मी आणि प्रेक्षक यांच्यातील विश्वास कायम राहिला पाहिजे, त्या दृष्टीने चित्रपटकर्मींनीही प्रयत्न केले पाहिजेत, असे जोशी यांनी निवेदनात म्हटले आहे.

# प्रत्येकजण काहीतरी मोठं करू इच्छितो, पण मी...'' करीना कपूर



आता लवकरच २०२३ हे वर्ष सुरू होणार आहे. त्यानिमित्त सर्वत्र आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण आहे. कोणी न्यू इयर पार्टीचा प्लॅनिंग करण्याच्या तयारीत आहे तर कोणी नवीन वर्षाचे नवे संकल्प करण्याच्या मागे आहे. बॉलिवूड कलाकारही यात मागे नाहीत. अभिनेत्री करीना कपूर हिने आता नवीन वर्षातील तिच्या प्लॅन्सबद्दल भाष्य केलं आहे.

करीना कपूर सध्या तिच्या कुटुंबीयांबरोबर स्विझर्लंडमध्ये व्हेकेशनचा आनंद उपभोगतेय. या ट्रिपदरम्यानचे त्यांचे काही फोटोही तिने सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. २०२२ ला निरोप देताना २०२३ चांगलं जावं यासाठीही तिने काही संकल्प केले आहेत. करीनाने नुकतीच एक मुलाखत दिली. मुलाखतीत तिने तिच्या करिअरच्या प्रवासाबद्दल सांगितलं, तसंच नवीन वर्षाचे संकल्पही शेअर केले.ती म्हणाली, "कपूर कुटुंबातील प्रत्येकजण कलाकार आहे पण प्रत्येकाचा प्रवास वेगवेगळा आहे. जसं माझे वडील रणधीर कपूर आणि काका ऋषी कपूर यांचा इंडस्ट्रीतला प्रवास खूप वेगळा आहे, तसाच माझा आणि माझी बहिण करिष्माचाही प्रवास वेगळा आहे. आमच्या कुटुंबातील प्रत्येकाने आपापला मार्ग निवडला आणि यश मिळवून दाखवलं. अशा कुटुंबाचा मी भाग आहे याचा मला कायम अभिमान आहे."

# 'प्राजक्ता अडकणार विहबंधनात..

**मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी हिची लोकप्रियता काही कमी नाही. ती सर्वांची लाडकी आहे. तिचं सौंदर्य सर्वांना भुरळ घालण्यासाठी पुरेसं आहे. त्यातच तिच्या अभिनयाला तर तोडचं नाही. ती कायमच चर्चेत असते.**



**प्राजक्ताचा चाहता वर्ग मोठा असून ती सोशल मीडियावरुन चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करते. तिचे चाहते नेहमीचं तु कधी करणार असा प्रश्न विचारत असतात. तर प्राजक्ता कोणासोबत लग्न करणार याचीही सर्वांना उत्सूकता आहे. अनंत पटवा यांनी प्राजक्तासाठी येणारं २०२३ हे वर्ष कसं असणार आहे? ति[...] कुंडलीत यंदा लग्नाचा योग आहे क[...] तिच्याकडे काही नवीन प्रोजेक्टस येण[...] आहेत का? याबद्दल माहिती दिली[...] येणारे पुढिल वर्ष हे प्राजक्तासाठ[...] चांगलं असणार आहे. तिला नवीन प्रोजेक्ट मिळण्याची शक्यता आहे. तिचं करिअर उंचीच्या शिखरावर जाणार आहे . २३ जानेवारीनंतर तिला अनेक गोष्टींमध्ये फायदा होणार आहे. जुलै २०२३ नंतर तिचे वैयक्तिक जीवन फारच चांगलं राहणार आहे. गुरुच्या कृपेमुळे प्राजक्ताच्या लग्नाचे योगही दिसत आहेत. मात्र ती तिच्या कामात व्यस्त असल्यामूळं ती लग्नाचा प्लॅन पुढं ढकलणार असल्याचंही म्हटलं आहे.**

# अनघाच्या खऱ्या आयुष्यात नव्या मेंबरची एन्ट्री



सध्या आई कुठे काय करते मालिकेत रंजक वळणं येत आहेत. मालिकेत आता अनघा आणि अभिजित या व्यक्तीरेखांभोवती कथा फिरताना दिसतेय. दोघांना नुकतीच मुलगी झालेली दाखवलीय अन् दुःखी अनघाच्या आयुष्यात त्या कारणानं आनंदाचे चार क्षण वाट्याला आलेले आहेत.

पण ही अनघा साकारणाऱ्या अश्विनी महांगडेच्या वैयक्तिक आयुष्यातही अशीच आनंदाची गोष्ट घडली आहे.

आपल्या मेहनतीने कार खरेदी करणे हा एक आपल्या आयुष्यातील वेगळा क्षण आणि आनंद असतो आता असाच आनंद . आई कुठे काय करते या मालिकेतून प्रेक्षकांच्या मनात घर करणारी अनघा म्हणजे अभिनेत्री अश्विनी महांगडे साजरा करत आहे.

अश्विनी महांगडेच्या परिवारात झाली आहे नवीन मेंबरची एंट्री. अश्विनी महांगडे ही नेहमीच सोशल मीडियावर सक्रीय असते.

२०२२ अश्विनीसाठी खुप आनंदाच आहे ठरलं आहे.

अश्विनी महांगडे MAHINDRA XUV 300 रेड कलरची नवीन कार खरेदी केली आहे. यांची माहिती तिने स्वतः इंस्टाग्रामवर शेअर केली आहे आहे. तिने एक पोस्ट आणि कार सोबतचा व्हिडिओ शेअर केला आहे. पोस्ट मध्ये लिहिले आहे " 'तुमची खरी मेहनत तुम्हाला फळ देतेच..नानांचे स्वप्न,नानांचा आशीर्वाद"अश्विनीनं कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु होता त्या दरम्यान आपल्या वडलांना गमावलं होतं. त्यावेळी भावूक झालेली अश्विनी सगळ्यांनीच पाहिली असेल.अश्विनीच्या गाडी इतकंच फोटोत लक्ष वेधून घेत आहे ते तिचा मराठमोळा नववारीचा साज.

## शॉर्ट न्यूज »

### भारतीय क्रिकेटपटू ऋषभ पंतच्या कारला भीषण अपघात;



**मुंबई । महाईन्यूज ।**

भारतीय क्रिकेट संघातील धडाकेबाज खेळाडू ऋषभ पंतच्या कारला भीषण अपघात झाला असून, यामध्ये ऋषभ पंत गंभीर जखमी झाला आहे. दिल्लीहून ऋषभ घरी येत असताना त्याच्या कारला हा भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. रूरकीच्या नारसन सीमेवर हम्मदपुर झाल जवळील एका वळणावर ऋषभच्या कारचा अपघात झाला. यामध्ये ऋषभ गंभीर जखमी झाल्याने त्याला तातडीने देहरादून रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.या भीषण अपघातीच माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस दाखल झाले आणि खानपुरचे आमदार उमेश कुमार हेदेखील रुग्णालयात पोहचले आहेत. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार ऋषभ पंतच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली आहे. सध्या त्याची प्रकृती स्थिर असून, त्याच्यावर प्लास्टिक सर्जरी केली जाणार आहे.अपघातस्थळी असलेल्या प्रत्यक्षदर्शींनी सांगितल्यानुसार, ऋषभची कार रेलिंगला धडकली, ज्यानंतर कारने पेट घेतला. मोठ्या प्रयत्नानंतर कारची आग विझवण्यात यश आलं.

## निमगाव म्हाळुंगीच्या आश्रमशाळेतील

# तीन मुलींची हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड!



**। तळेगाव ढमढेरे । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

निमगाव म्हाळुंगी (ता. शिरूर) येथील श्रीमती बबईताई टाकळकर प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील तीन मुलींची ५१ व्या हिंद केसरी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पठारे क्रीडा संकुल खराडी पुणे येथे भारतीय शैली कुस्ती महासंघातर्फे ५१ व्या हिंदकेसरी मातीवरील कुस्ती स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड चाचणी स्पर्धा झाली. या स्पर्धेसाठी निमगाव म्हाळुंगी येथील श्रीमती बबईताई टाकळकर प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील अश्विनी किशोर विटकर, आरती नवनाथ पवार व सोनिका नंदू चव्हाण या तीन मुलींची महाराष्ट्र संघामध्ये निवड झाली आहे.

**आश्रमशाळेतील मुलींनी कुस्ती स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल माजी आमदार सूर्यकांत पलांडे यांनी विशेष कौतुक केले असून, यापूर्वीही या आश्रमशाळेतील मुलींनी राष्ट्रीय पातळीवर कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले आहे. आगामी काळातही शिक्षण संस्थेच्या विविध शाखांतर्फे अभ्यासाबरोबरच विविध खेळांना विशेष प्राधान्य दिले जाईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उज्वल यश मिळवावे अशी अपेक्षा श्री पलांडे यांनी व्यक्त केली.'**

देश पातळीवरील ५१ वी हिंदकेसरी माती कुस्ती स्पर्धा ६ ते ८ जानेवारी २०२३ या कालावधीत हैद्राबाद -तेलंगणा येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी आश्रमशाळेतील तीन मुलींची महाराष्ट्र संघामध्ये निवड झाली आहे. तसेच महाराष्ट्र संघाचे टीम मॅनेजर म्हणून आश्रमशाळेचे अधीक्षक झेंडू पवार यांची निवड झाली आहे. निवड झालेल्या तीनही मुलींना कुस्तीचे प्रशिक्षण अधीक्षक झेंडू पवार यांनी दिली आहे.

हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेल्या तीन मुलींचा व मार्गदर्शक शिक्षक झेंडू पवार यांचा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार सूर्यकांत पलांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुढील स्पर्धेसाठी मुलींना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष सुदामराव चव्हाण, सचिव कांतीलाल टाकळकर, दशरथ लांडगे, काळुराम चव्हाण, मुख्याध्यापिका लता चव्हाण व सुनिता करपे, चित्रा मुळे, जागृती वाळके आदी उपस्थित होते.

'आश्रमशाळेतील मुलींनी कुस्ती स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल माजी आमदार सूर्यकांत पलांडे यांनी विशेष कौतुक केले असून, यापूर्वीही या आश्रमशाळेतील मुलींनी राष्ट्रीय पातळीवर कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले आहे. आगामी काळातही शिक्षण संस्थेच्या विविध शाखांतर्फे अभ्यासाबरोबरच विविध खेळांना विशेष प्राधान्य दिले जाईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उज्वल यश मिळवावे अशी अपेक्षा श्री पलांडे यांनी व्यक्त केली.'

# तालुकास्तरीय 200 मिटर धावण्याच्या स्पर्धेत सोहम वारागडे प्रथम

## यशवंतराव चव्हाण तालुकास्तरीय बाल क्रीडा स्पर्धा उत्साहात, ग्रामस्थांकडून कौतुकाचा वर्षाव

**।मेढा (जावली) । महाईन्यूज । निलेश दुटाळ ।**

यशवंतराव चव्हाण तालुका स्तरीय बाल क्रीडा स्पर्धा नुकत्याच जि .प.प्राथ.केंद्र शाळा सावली या ठिकाणी पार पडली. यामध्ये तालुक्यातील अनेक शाळांनी भाग घेतला होता. यामध्ये जि. प. प्रा शाळा आलेवाडी ता जावली जिल्हा सातारा याशाळेमध्ये इयत्ता 5 वीमध्ये शिकत असलेला सोहम विश्वनाथ वारागडे वय वर्षे 12 लहान गटातून 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून विजयी ठरला.सोहम याच्या या यशामुळे परिसरातील ग्रामस्थांनी अभिनंदन करून कौतुकाचा वर्षाव केला आहे. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.





सोहमला लहानपणापासून खेळाची आवड होती. आणि शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आई-वडीलांची प्रेरणा घेऊन त्याने तालुका स्तरावर 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तालुकास्तरावरीय स्पर्धेत विजयाबद्दल त्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आलेवाडी शाळेतील मुख्यध्यापक शिक्षक आणि ग्रामस्थ यांनी अभिनंदन आणि कौतुक केले. सोहला शाळेतील क्रीडाशिक्षक निकम सर यांचे मार्गदर्शन लाभले.

जावली तालुक्यातील आलेवाडी या गावामधील जास्तीत जास्त विद्यार्थी हे क्रीडाक्षेत्रात चमकदार कामगिरी करतात. जावली तालुक्यातील कडेकपारीच्या मधोमध पायथ्याला असलेल्या या गावाला शेतकर्यांचे समृद्ध गाव म्हणून ओळखले जाते.गावातील अनेक होतकरू विद्यार्थी खिलाडूवृत्तीचे असल्यामुळे शालेयस्तरावर विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवित असतात. सोहम वारागडेही याचाच एक भाग आहे. दैनंदिन रहाटगाड्यातून अनेक समस्यांना तोंड देत सोहम सारखे कित्येक विद्यार्थी धावण्याचा सराव करत असतात.



**“ सोहम याने मिळवलेल्या यशामुळे तालुकास्तरावर आलेवाडी गावचा नावलौकिक निश्चित वाढला आहे. सोहमचा आदर्श घेऊन गावातील इतर विद्यार्थ्यांनी देखील विविध स्पर्धेत सहभाग घ्यावा. सोहमने तालुक्यापुरते मर्यादित न राहता जिल्हा, राज्यस्तरीय, राष्ट्रीय पातळीवर स्पर्धेत सहभाग घेऊन यश पादाक्रांत करावे. याच सदिच्छा. आणि सोहमचे खूप खूप अभिनंदन. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...**

**- लक्ष्मण पवार,** अध्यक्ष पद्मावती प्रगती मंडळ, आलेवाडी